वि.दि.दावा.क्र. ३७/२०२४
विनोद वि. अरूणा
निशाणी क्र. १३ क्रमश :

**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास वादीचे वकिल श्री.एन.आर.राठी यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

**११.** मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

**१२.** मी या दाव्यात निशाणी ३ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला मालमत्ता पत्रक दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १८** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ३ ला स्थावर मालमत्तेची दिनांक ३०.०१.२०२४ रोजीची इसारपावती दाखल केली आहे. त्यावर माझ्या व प्रतिवादीच्या सहया आहेत. तसेच त्यावर दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १९** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ४ ला माझे दिनांक ३०.०७.२०२४ रोजी तहसिलदार अकोट यांचेसमक्ष केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २०** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ५ ला मी माझे वकीलांच्या मार्फत दिनांक ०१.०८.२०२४ रोजी प्रतिवादीला पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. तसेच त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते. सदर नोटीसीबाबतची पोष्टाची पावती व सदर नोटीसीचा परत आलेला लिफाफा निशाणी ३ या यादीसोबत अ.क्र. ६ व ७ ला दाखल आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी २२ व २३** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ८ ला मी दिनांक १२.०८.२०२४ रोजी तहसिलदार, अकोट यांचेसमक्ष केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २४** देण्यात येते.

**१३.** तसेच मी या दाव्यात निशाणी १७ या कागदपत्राच्या यादीसोबत अ.क्र. १ ला सुचीक्रमांक २ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. २ ला मला प्रतिवादी हिने दिलेले दिनांक १२.०८.२०२४ रोजीचे उत्तर दाखल केले आहे. त्यावर प्रतिवादीची सही आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**प्रतिवादी विरूध्द प्रकरण विना लेखीजबाब चालविण्यात येत आहे. तसेच आज रोजी प्रतिवादी व तिच्या वकीलांच्या नावाचा पुकारा केला असता ते गैरहजर. सबब उलटतपास काही नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—
( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**

दि. २४.०७.२०२५.